गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १४० वा ● सोमवार ०९ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 140 | Date : 09/10/2023 | blow :Manday | Page 4 | Price 4

## राज्यातून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू

मुंबई : यंदा राज्यात फारसा चांगला पाऊस पडलेला नाही. ज्यामुळे ग्रामीण भागांत शेतकरी हवालदिल झाला आहे. परंतु, आता देशातील अनेक राज्यांमधून मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर काही राज्यांमध्ये यामुळे तापमानातदेखील वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रात पुणे आणि मुंबई शहरांत तापमानात वाढ झाली असून नागरिकांना उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात झाली आहे. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाल्याने पावसाच्या जोरदार सरी बरसताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून पूर्णपणे माघारी परतणार असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पूर्व उत्तर प्रदेश, पूर्व मध्य प्रदेशातील उर्वरित भागांमधून नैऋत्य मान्सूनच्या माघारीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याचे पाहायला मिळत आहे. तर, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, तेलंगणा राज्याच्या काही भागातही मान्सून परतणार आहे. पुढील २ ते ३ दिवसांमध्ये महाराष्ट्र आणि मध्य अरबी समुद्राच्या भागातून नैऋत्य मोसमी वारे माघारी फिरतील.

# राष्ट्रवादीतील फुटीबाबत आज दोन सुनावण्या

### दोन्ही गटाच्या युक्तीवादाकडे लक्ष

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेसमधील कथित फुटीसंदर्भात सोमवारी दोन सुनावण्या होत आहेत. मूळ पक्षावर दावा करणाऱ्या अजित पवारांच्या याचिकेवर केंद्रीय निवडणूक आयोगासमोर दुसऱ्यांदा युक्तिवाद केला जाईल. तर, पक्षाच्या नऊ आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात शरद पवार गटाने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे शरद पवार गटाने महायुती सरकारमध्ये मंत्री झालेल्या नऊ आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी अर्जाद्वारे केली आहे. याप्रकरणी पवार गटाने सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली असून न्यायालयाने विधानसभाध्यक्षांना निर्देश द्यावेत अशी मागणी करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दाखल केलेल्या या याचिकेमुळे शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात विधानसभाध्यक्षांना सुनावणी घ्यावी लागणार आहे. पण, तोपर्यंत आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण प्रलंबित राहील.

केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सोमवारी होणाऱ्या सुनावणीमध्ये प्रामुख्याने अजित पवार गटाच्या वतीने युक्तिवाद केला जाणार असून विधिमंडळ पक्षामधील बहुमत गृहीत धरून मूळ पक्षावर हक्क सांगितला जाण्याची शक्यता आहे. पक्षाचे ५३ पैकी ४३ आमदार, विधान परिषदेतील ९ पैकी ६ आमदार आपल्या बाजूचे असल्याचा युक्तिवाद अजित पवार गटाच्या वतीने शुक्रवारी झालेल्या सुनावणीत करण्यात आला होता. सोमवारी या मुद्दयाला बळकटी देणारे युक्तिवाद केले जातील. मात्र, विधिमंडळ पक्षातील बहुमताच्या युक्तिवादावर शरद पवार गटाच्या वतीने आक्षेप घेण्यात आला आहे. आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण प्रलंबित असेल तर विधिमंडळ पक्षातील बहुमत गृहीत धरता येणार नाही, असा निकाल शिवसेनेच्या फुटीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने । पान २ वर

## इस्त्रायल आणि हमासमध्ये १ हजारांहून नागरिकांचा मृत्यू



मुंबई : गाझा पट्टीतील सत्ताधारी 'हमास' या दहशतवादी गटानं शनिवारी पहाटे इस्रायल अचानकपणे हल्ला केला. हमासने इस्रायलवर ५ हजार रॉकेट्स डागले. याला इस्रालयनेही चोख प्रत्युत्तर देत गाझा पट्टीत रॉकेट्स हल्ले केले आहेत. यामध्ये इस्रायल आणि हमासमध्ये १००० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. 'इंडिया टुडे'नं दिलेल्या वृत्तानुसार, हमानसे केलेल्या रॉकेट हल्ल्यात ६०० हून अधिक इस्रायली नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर, इस्रायलने 'ऑपरेशन आयर्न स्वोर्ड्स'अंतर्गत केलेल्या हवाई आणि लष्करी हल्ल्यात ३७० हमास नागरिकांचा मृत्यू झाला आहे. इस्रायलकडून गाझा पट्टीत बॉम्ब हल्ले सुरूच आहेत.

नेपाळचे परराष्ट्र मंत्री एन. पी. सौदन यांनी रविवारी सांगितल्यानुसार, हमास दहशतवादी संघटनेच्या हल्ल्यानंतर दक्षिण इस्रायलमध्ये शिकणारे १२ नेपाळी विद्यार्थी बेपत्ता झाले आहेत. त्यांच्या जीवाला धोका असण्याची शक्यता आहे. हमासकडून १०० नागरिक आणि सैनिकांचं अपहरण करण्यात आल्याचं इस्रायलकडून सांगण्यात आलं आहे. इस्रायल लष्कराचे प्रवक्ते डॅनियल हगारी यांनी म्हटलं, गाझामधील ४२६ ठिकाणांना लक्ष्य करण्यात आलं आहे. यात हमासकडून रॉकेट्स हल्ला करण्यासाठी वापरण्यात आलेल्या १० टॉवर्सचाही समावेश आहे.

## बोर्डाच्या परीक्षेला वर्षातून दोनदा बसणे बंधनकारक नाही : धर्मेंद्र प्रधान




नवी दिल्ली : काही दिवसांपूर्वी दहावी-बारावीची बोर्डाची परीक्षा दोन टप्प्यात घेण्याचा निर्णय केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जाहीर केला होता. त्यानंतर आता या बोर्ड परीक्षांबद्दल एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षेला वर्षातून दोनदा बसणे बंधनकारक असणार नाही, असे केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी सांगितले आहे. ते पूर्णपणे ऐच्छिक असेल आणि विद्यार्थ्यांना येणारा ताण कमी करणे हा त्याचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी माध्यमांना सांगितले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले की, सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशनची (सीएबीए) पुनर्रचना केली जात आहे. त्याची जुनी आवृत्ती खूप विस्तृत आहे आणि आजच्या शिक्षण व्यवस्थेच्या मागण्या वेगळ्या आहेत. ते म्हणाले की, अशावेळी जेव्हा आपण एनईपी सोबत आदर्श स्वरुपाचे बदल करत आहोत. अशावेळी सीएबीएतसुध्दा सुधारणा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## नोटा बदलण्याची अंतिम मुदत संपली! आता पुढं काय? 'हे' आहेत मार्ग



नवी दिल्ली : भारतीय रिझर्व्ह बँकेने ३० सप्टेंबरपर्यंत २००० रुपयांची नोट बदलून घेण्याची किंवा जमा करण्याची अंतिम मुदत दिली होती. त्यानंतर ७ ऑक्टोबर पर्यंत ही मुदत वाढवण्यात आली होती. ही अंतिम मुदत देखील आता संपली आहे. त्यामुळं आता ज्यांच्याकडे दोन हजार रुपयांच्या नोटा आहेत, त्यांच्यासाठी आता पुढे काय? असा प्रश्न निर्माण झाला असेल. तर त्यांच्यासाठी देखील काही मार्ग आहेत.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार आजपासून कोणतीही बँक २००० रुपयांचे चलन स्वीकारणार नाही. मात्र, त्यानंतरही या नोटा कायदेशीर राहतील. अशा परिस्थितीत तुमच्याकडेही दोन हजार रुपयांच्या नोटा असतील तर मुदत संपल्यानंतरही तुम्ही त्या बदलून जमा करू शकता. दोन हजार रुपयांच्या नोटा बदलण्यासाठी । पान २ वर

## न्यायालयामुळे 'न्याय आपल्या दारी' : न्यायमूर्ती भूषण गवई



रत्नागिरी: मंडणगडच्या नागरिकांना दापोली येथील न्यायालयात जावे लागत होते. आज सुरु झालेल्या न्यायालयामुळे न्याय त्यांच्या दारी आला आहे. त्यामुळे कमीत कमी खर्चात, कमीत कमी वेळेत न्याय मिळणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वकिली शताब्धी वर्षात हे न्यायालय सुरु होत आहे, हा दुग्धशर्करा योग आहे. गरीब नागरिकांना न्याय देण्याचे काम या न्यायालयाच्या इमारतीमधून घडो, अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी शुभेच्छा दिल्या.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव असणाऱ्या आंबडवेच्या तालुका ठिकाणी जिल्हा परिषदेच्या इमारतीत दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयाचे उद्घाटन न्यायमूर्ती श्री. गवई यांच्या हस्ते, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय, उपमुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री । पान २ वर

## सिक्कीममध्ये ९ लष्करी जवानांसह ३२ जणांचे मृतदेह सापडले

### अद्याप बेपत्ता असलेल्या शंभर लोकांचा शोध सुरू

गंगटोक : सिक्कीमला उद्धवस्त करणाऱ्या तिस्ता नदीच्या आकस्मिक पुराचा चिखल आणि ढिगारे यांतून आतापर्यंत नऊ लष्करी जवानांसह ३२ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. याच वेळी, अद्यापही बेपत्ता असलेल्या शंभरहून अधिक जणांचा शोध सुरूच आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

बुधवारी पहाटे ढगफुटीमुळे आलेल्या आकस्मक पुराचा ४१,८७० लोकांना फटका बसला आहे. आतापर्यंत देशाच्या इतर भागांशी संपर्क तुटलेल्या राज्याच्या निरनिराळय़ा भागांतून २५६३ लोकांची सुटका करण्यात आली आहे, असे सिक्कीम राज्य आपदा व्यवस्थापन प्राधिकरणाने सांगितले.अद्याप बेपत्ता असलेल्या १२२ लोकांचा शोध सुरू आहे. पाक्याँग जिल्ह्यातील ७२, गंगटोक जिल्ह्यातील । पान २ वर

## भारतीय हवाई दलाला मिळाला नवा ध्वज, ९१ व्या वर्धापन दिनी झेंड्याचं अनावरण



नवी दिल्ली : आज भारतीय हवाई दल चा ९१ वा स्थापना दिवस आहे. या निमित्ताने आज वायू दलाला नवा ध्वज मिळाला आहे. भारतीय हवाई दलाच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने नवीन झेंड्याचं अनावरण करण्यात आलं आहे. ७२ वर्षांनंतर हा बदल करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी वायुसेना दिनानिमित्त हवाई दलाला शुभेच्छा दिल्या आहेत. आज वायुसेना दिनानिमित्त प्रयागराजमध्ये एअर शोचे आयोजन करण्यात आलं आहे.

९१ व्या स्थापनेच्या मुहूर्तावर भारतीय हवाई दलाच्या वेगळ्या अध्यायाला सुरुवात झाली आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. कारण, आज भारतीय हवाई दलाला नव्या झेंड्याचं अनावरण करण्यात आलं आहे.। पान २ वर

## मृत्यूनंतरही मरता मरण संपेना नो पार्किंगचा फटका बसतोय थेट मृतदेहाना

### मुस्लिम कब्रस्ताना समोर बेशिस्त वाहन पार्किंग मुळे मृतदेहाना कसरत करत काढावी लागते वाट

अक्कलकोट/प्रतिनिधीः मृत्यूनंतरही मरता मरण संपेना नो पार्किंगचा फटका थेट मृतदेहाना बसत आहे मुस्लिम कब्रस्ताना समोर बेशिस्त वाहन पार्किंग मुळे मृतदेहाना कसरत करत वाट काढावी लागत आहे मृत्यू झाल्यावर रितीरिवाजाने व शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार केले जातात. ही प्रथा प्रत्येक समाजात पहावयास मिळते.अंतिम संस्काराला जाणाऱ्याना प्रत्येक नागरिक किंवा वाहनधारक हा वाट देताना आढळून येतो. मात्र अक्कलकोट तालुक्यात उलटंच चित्र पहावयास मिळत आहे. मृत्यू झाल्या नंतर मृतदेहाना स्मशानभूमीत जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. बेशिस्त वाहन पार्किंग केली जात असल्याने मृत्यू नंतरही मरण संपत नसल्याच चित्र निर्माण झाला आहे. अक्कलकोट शहरातील मुस्लिम समाजाच्या कब्रस्तान गेट समोर नो पार्किंग मध्ये बिनधास्तपणे वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे वाहन बाजूला करेपर्यंत मृतदेहाला ताटकळत स्मशानभूमी बाहेर थांबावे लागत आहे. मुस्लिम कब्रस्तान मध्ये मयत घेऊन येणाऱ्या लोकांना बेशिस्त पार्किंगचा भयंकर त्रास होत आहे. ही बेशिस्त वाहन पार्किंग देवस्थानला येणाऱ्या भाविकांकडून होत आहे. अक्कलकोट देवस्थानला येणाऱ्या भाविकांकडून बेशिस्त व नो पार्किंगमध्ये वाहन पार्क होत आहे.याचा फटका थेट मृतदेह घेऊन येणाऱ्या मृताच्या नातेवाईकांना बसत आहे. अक्कलकोट एमआयएमच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी स्थानिक पालिका प्रशासनाला व पोलीस प्रशासनाला निवेदन दिले आहे. मुस्लिम कब्रस्तान समोर कोणत्याही प्रकारची वाहने उभी करू नये असे निवेदन दिले आहे.




मंदिर परिसरात पार्किंगची सोय असताना मग कब्रस्तान समोर का? मंदिर परिसरात पार्किंगची सुविधा असताना अनेक भाविक रस्त्यावर कोठेही व मुस्लिम कब्रस्तान समोर बेशिस्त वाहन पार्क करत आहेत. मुस्लिम समाजाची मयत घेऊन आल्यावर विधी पूर्ण कराव्या लागतात. मृतदेह समोर ठेवून मुस्लिम बांधव जनाजा नमाज अदा करतात. परंतु नमाज पूर्ण करण्यासाठी बांधलेल्या मस्जिदसमोर नेहमीच बेशिस्त वाहन पार्क केले जात आहे. मंदिराला येणरे भाविक व इतर नागरिक सर्रास गाड्या पार्क करून निघून जातात. त्यामुळे मृतदेह कब्रस्तानात घेवुन जाण्यास मोठा अडथळा निर्माण होत आहे याकडे नगरपरिषद आणि ट्रॅफिक पोलीस याकडे पद्धतशीर दुर्लक्ष केले आहेत.

दैनिक यश सिद्धी न्यूज

संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे मो.9921988358

सुवर्णसंधी

लेखक/कवि/साहित्यक/विचावंत यांना सुवर्णसंधी

दैनिक यशसिध्दी न्यूज या वृत्तपत्राच्या दिवाळी विशेषांकामध्ये

आपले लेख/कविता/इतर साहित्य प्रकाशनासाठी संपर्क मो.९९२१९८८३५८ साधावा.

: संपादक :
कमलाकर सोनकांबळे

www.yashsiddhinews.com
Epepar-yashsiddhinews.com

टिप : दिवाळी अंक हा पुस्तक स्वरुपात असेल...

## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### शटडाऊनचा सध्या धोका..

सध्या डेमोक्रेटिक पक्षाचे जो बायडेन हे अध्यक्ष आहेत. पण तेथे या दोन पक्षांमध्ये सातत्याने कुरघोडीचे राजकारण चालत असते. या राजकाणापायीच तेथे अनेकदा अमेरिकेला शटडाउनचा धोका असतो. सध्याही एक ऑक्टोबरपासून अमेरिकेला शटडाउनचा धोका होता. सिनेटमध्ये खर्चाच्या विधेयकाला मंजुरी द्यावी लागते. रिपब्लिकन पक्षाने खर्चाचे विधेयक अडवून धरल्याने अमेरिकेला सध्या शटडाउनचा धोका जाणवत आहे. शटडाउन म्हणजे काय ते समजावून घ्यावे लागेल. तर त्याचा अर्थ असा की, अमेरिकन अर्थव्यवस्थेत निधीची टंचाई आहे आणि त्यासाठी सिनेटला खर्चाचे विधेयक मंजूर करावे लागेल. अमेरिकेवर ही वेळ का आली, हे समजून घ्यायचे असेल तर हे माहित करून घ्यावे लागेल की, अमेरिकेत दोन ट्रिलियन डॉलर्स इतकी प्रचंड अर्थसंकल्पीय तूट आली आहे. कोविडपूर्व काळातील स्थितीपेक्षा ही तूट कितीतरी जास्त आहे. ही तूट इतकी जास्त वाढण्याचे कारण हे आहे की, अमेरिकेने कोविडपूर्व काळात होता त्याच्या स्तराइतकाच खर्च केला. पण दरम्यानच्या काळात खर्च मात्र महत्त्वपूर्णरीत्या वाढला आहे. त्यातून ही प्रचंड अर्थसंकल्पीय तूट आली. अमेरिकेला असे शटडाउन होणे हे काही पहिल्यांदाच झाले आहे, असे मात्र नाही. यापूर्वी कितीदा तरी अमेरिका या संकटाला सामोरे गेली आहे. पण रिपब्लिकन पक्षाने डेमोक्रेटिक पक्षाला अडचणीत आणण्यासाठी खर्चाच्या विधेयकाला मंजुरी देण्यात आडकाठी आणली आहे. त्यामुळे हे विधेयक अडकले आणि त्यामुळे शटडाउनचा धोका निर्माण झाला. सध्या अमेरिकेवरील हे संकट आता टळले असले तरीही त्याचे परिणाम अप्रत्यक्ष भारतालाही भोगावे लागणार आहेत. कारण अमेरिकन सरकारकडे निधीची टंचाई निर्माण झाल्याने गुंतवणुकीवर परिणाम होणार आहे. त्याचा फटका भारतीय कंपन्यांना बसणार आहे आणि त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार आहे. अमेरिकन पर्यटकांवर भारताचा पर्यटन व्यवसाय चालतो. पण अमेरिकन नागरिकांच्या उत्पन्नावर परिणाम होणार असल्याने भारतातील पर्यटन व्यवसायाला फटका बसणार आहे. कोरोना महामारीतून बाहेर पडलेल्या भारतीय पर्यटन व्यवसायाला कोणताही हादरा परवडणारा नाही. पण आता अमेरिकेतून हा दणका मिळाल्याने भारतातील पर्यटन व्यवसाय अडचणीत सापडण्याची शक्यता आहे. १९३० मध्ये अमेरिकेत अभूतपूर्व मंदी आली होती. त्यापेक्षाही हे संकट कमी गंभीर नाही.

नांदेड येथील सुप्रसिद्ध बालसाहित्यकार डॉ. सुरेश सावंत यांचे मराठी बालसाहित्यात फार मोठे योगदान आहे. बालसाहित्य आणि बालशिक्षण हे त्यांच्या अगदी जिव्हाळ्याचे विषय आहेत. गेली तीन तपे ते अविरत बालसाहित्यनिर्मिती करत आहेत. बालसाहित्यातून बालशिक्षण हसतखेळत आणि आनंददायी झाले पाहिजे, यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. त्यासाठी ते आपल्या लेखनात वेगवेगळे प्रयोग करतात. नुकताच त्यांचा चेतक बुक्स प्रकाशनाने प्रकाशित केलेला 'एलियन आला स्वप्नात' हा बालकाव्यसंग्रह छोट्या दोस्तांच्या भेटीला आला आहे. या काव्यसंग्रहातील कविता किशोर, वयम, छात्रप्रबोधन, मनशक्ती, छावा, ऋग्वेद, कथामाला, निर्मळ रानवारा, मुलांचे मासिक या दर्जेदार मासिकांमध्ये यापूर्वी प्रकाशित झालेल्या आहेत.

'डायनॉसोरची बहीण' या अतिशय सुंदर कवितेपासून या संग्रहाची सुरुवात होते. या काव्यसंग्रहात प्राण्यांची, पक्ष्यांची आणि फळांची माहिती मनोरंजक पद्धतीने कवीने अतिशय खूबीने दिली आहे. सुरुवातीला अतिशय मनोरंजक पद्धतीने मुलांची जिज्ञासा जागृत करून मुलांना ज्ञान देण्याचा कवीने केलेला प्रयत्न चांगलाच यशस्वी झाला आहे. यातून विद्यार्थ्यांमध्ये वाचण्याची आवड तर निर्माण होतेच, शिवाय त्यांचे मनोरंजन करून त्यांच्या ज्ञानात वृद्धी होते. त्यामुळे कवीने केलेला हा प्रयत्न अतिशय यशस्वी झाला आहे.

'डायनॉसोरची बहीण' या कवितेत कवी म्हणतो :

मगरबाई अहो मगरबाई
एवढी तुम्हाला कसली घाई?
राखाडी, करडा, काळपट रंग
टणक बुलेटप्रुफ तुमचे अंग

गरीचे हे वर्णन मुलांना मनोरंजनातून नकळतपणे ज्ञान देऊन जाते. ती शिकार कशी करते हे सांगताना कवी म्हणतो,

## ज्ञानाबरोबर मनोरंजनातून आनंद देणारा काव्यसंग्रह 'एलियन आला स्वप्नात'


### सचिन बेंडभर पाटील, पुणे.

शिकार दिसताच येते जाग
लालबुंद डोळ्यात भुकेची आग
बेसावध प्राण्यावर करता हल्ला
जबडा आ वासून मारता डल्ला

अशा प्रकारे मनोरंजनातून प्राण्यांची शरीररचना, त्यांचे राहण्याचे ठिकाण, शिकार करण्याची पद्धत याचे वर्णन कवीने साध्या आणि सरळ शब्दांत केले आहे. ओघवत्या शैलीमुळे ही कविता बालमनाचा अचूक ठाव घेते.

'असून नसून सारखेच' ही कविता विशेष वाचनीय असून बालमनाला आनंददायी अनुभव देणारी आहे. यात कवी म्हणतो,

घड्याळाचे काटे कधीच
कुणालाच नाही टोचत
डोळे असूनही सीताफळ
पुस्तक नाही वाचत
चार पाय असूनसुद्धा
टेबल चालत नाही
तोंड असले तरी बाहुली
मुळीच बोलत नाही.




मुले अशा कवितेत अगदी हरवून जातात. केवळ कल्पनेत न रमता कवीने मुलांना वास्तवाचे भान करून देत त्यांच्या ज्ञानात मोलाची भर टाकली आहे. मुलांना आवडतील अशा विषयांची निवड करून त्यावर कवीने सुंदर शब्दांची गुंफण केली आहे. यात कुठेही कृत्रिमता जाणवत नाही, इतक्या या कविता सहज सुंदर झालेल्या आहेत.

बालमनाला रुचेल, पचेल अशाच विषयांची व शब्दांची या काव्यसंग्रहात निवड केली आहे. त्यामुळे कुठेही बोजडपणा वाटत नाही. हलक्याफुलक्या विषयांतून मुलांचे मनोरंजन करण्याचा निखळ प्रयत्न कवीने केला आहे. असे मनोरंजनाचे दालन साहित्यप्रांतात उघडले, तर मुलांची पावले निश्चितच वाचनालयाकडे वळतील असा विश्वास वाटतो. अशा समृद्ध साहित्याची मराठी भाषेला नितांत गरज आहे. कवी सुरेश सावंत यांच्यासारखे कसलेले साहित्यिक मराठी भाषेचा गोडवा वाढवण्याचे काम करून आपल्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करतात, ही मराठी साहित्याच्या दृष्टीने अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.

पुणे येथील चेतक बुक्स यांनी या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि निर्मितीचा दर्जा त्यांनी घेतलेल्या मेहनतीची साक्ष देतो. प्रसिद्ध चित्रकार श्री. पुंडलिक वझे यांनी विषयाला अनुरूप काढलेली साजेशी चित्रे आणि आकर्षक मुखपृष्ठ पुस्तकाच्या वैभवात मोलाची भर टाकतात. कवी मा. डॉ . सुरेश सावंत यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा..!

**सचिन बेंडभर पाटील**
**कार्यकारिणी सदस्य,**
**अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे.**

पान १ वरुन

### राष्ट्रवादीतील फुटीबाबत..

दिला होता. त्यामुळे मूळ राष्ट्रवादी काँग्रेस कोणाची, हा वाद सोडवताना विधिमंडळातील बहुमताचा आधार घेता येणार नाही, असा युक्तिवाद शरद पवार गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी केला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोग पहिल्या सुनावणीनंतर लगेच तीन दिवसांमध्येच दुसरी सुनावणी घेत असल्याने मूळ पक्ष व निवडणूक चिन्हसंदर्भातील निर्णयासाठी विलंब होण्याची शक्यता नसल्याचे मानले जात आहे. शिवसेनेच्या प्रकरणात हंगामी आदेश देत निवडणूक चिन्ह गोठविण्यात आले होते. मात्र यावेळी शरद पवार गटानेही चिन्ह गोठवू नये अशी विनंती केली आहे. त्यामुळे अजित पवार गटाचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर शरद पवार यांच्या वतीने सिंघवी युक्तिवाद करतील व त्यानंतर लवकरात लवकर आयोग निवाडा देईल, अशी शक्यता आहे.

### न्यायालयामुळे 'न्याय आपल्या दारी'

उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनायक जोशी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. न्यायालय इमारतीची पहाणी सर्वांनी केली. दिवाणी न्यायाधीश एम.ए.शिंदे यांना यावेळी सर्वांनी शुभेच्छा दिल्या. यानंतर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयाच्या नविन इमारतीचा कोनशिला समारंभ करण्यात आला. तसेच कुदळ मारुन भूमिपूजनही करण्यात आले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या क्रीडांगणावर झालेल्या मुख्य सोहळ्यात बोलताना न्यायमूर्ती श्री. गवई म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकिली शताब्दीचे औचित्य साधून हा कार्यक्रम होत आहे. आजचा दिवस सोनेरी अक्षरांनी लिहिण्यारा आहे. त्यांच्या आंबडवे या मूळ गावात होणाऱ्या स्मारकापासून सदैव त्यांच्या कार्याची प्रेरणा आणि स्मृती मिळत राहील.

भारतीय राज्य घटनेच्या निर्मितीचा अमृत महोत्सव येत्या दोन वर्षात साजरा करु. राज्य घटनेला अनुसरुन समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत, कमीत कमी खर्चात कसा न्याय देता येईल, याबाबतचे काम या न्यायालयातून घडो.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गाव आंबडवे तालुक्याच्या ठिकाणी न्यायालय होतयं, हे अतिशय आनंदाची गोष्ट आहे. बाबासाहेबांनी देशाला असं संविधान दिलंय, लोकशाहीत निर्माण होणाऱ्या प्रश्नांना तेथे उत्तर सापडतं. जगात सर्वात मोठी असलेली लोकशाही या संविधानामुळे समृध्द होताना आणि ती निरंतर मजबूत होताना दिसते. शेवटच्या घटकाचा विचार संविधानात केला आहे. लोकशाहीच्या चार स्तंभापैकी सर्वाधिक विश्वासहर्ता न्यायपालिकेची आहे. नि:पक्ष न्याय मिळतो हा विश्वास जनजागात आहे, म्हणून लोकशाही अबाधित आहे.जिल्ह्यात ११ हजार ६३० दिवाणी तर २८ हजार ८३१ फौजदारी अशा प्रलंबित खटल्यांचे आपल्यासमोर आव्हान आहे. यातील अनेक खटले ३० वर्षापेक्षा जास्त रखडलेले दिसतात.सामान्य माणूस न्यायासाठी आस लावून बसलेला दिसतोय. सरन्यायाधीशांनी तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला आहे. महाराष्ट्र व गोवा बार कौन्सीलने ई- फाईलींगसाठी पुढाकार घेतला आहे. तो देशासाठी पथदर्शी आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग केल्याने न्यायदानावर असलेला भार कमी करण्याचे काम होणार आहे. जलद न्यायदान प्रक्रिया कशी करता येईल यासाठी आपण प्रयत्न करतोय.

८०० कोटींचा निधी पायाभूत सुविधांसाठी दिला. १३८ जलद गती न्यायालयांना देखील मान्यता दिली. न्यायाधीश निवासस्थानासाठी २५० कोटी दिले आहेत. कौटुंबिक न्यायालयाचे नव्याने निर्मिती करतोय. आंबडवे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याच्या उंचीला शोभेल असे जीवंत स्मारक बनवू, असेही ते म्हणाले.राज्यघटनेचे शिल्पकार आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ भूमीमध्ये येऊन आज धन्य वाटत आहे. बाबासाहेबांच्या स्मृतीला मी वंदन करतो अशी मराठीत सुरुवात करुन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. उपाध्याय म्हणाले, रक्तपाताविना क्रांती घडविण्याचे हत्यार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला राज्य घटनेच्या माध्यमातून दिले आहे.

पालकमंत्री श्री. सामंत म्हणाले, आंबडवे गावी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतीशिल्पाला ५० लाख रुपयांचा निधी जिल्हा नियोजन मधून दिला जाईल. त्याचबरोबर स्मारक करण्याचा निर्णय घेतला असून, २ वर्षात त्याचे लोकार्पण करु, असेही ते म्हणाले.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनायक जोशी यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. पालक न्यायमूर्ती माधव जामदार, महाराष्ट्र गोवा बार कौन्सीलचे अध्यक्ष विवेक घाटगे, सदस्य संग्राम देसाई यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला आमदार भाई जगताप, आमदार योगेश कदम, जिल्हाधिकारी एम देवेंद्र सिंह, पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांच्यासह जिल्ह्यातील न्यायाधीश, वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पुजनाने झाली.

### नोटा बदलण्याची अंतिम मुदत

तुम्हाला RBI च्या १९ क्षेत्रीय कार्यालयांपैकी एका कार्यालयात जावे लागणार आहे. तुम्ही कोणत्याही शाखेत जाऊन नोटा बदलून घेऊ शकता किंवा तुमच्या बँक खात्यात जमा करु शकता. याशिवाय, तुम्ही पोस्ट ऑफिसद्वारे RBI कार्यालयात २००० रुपयांची नोट देखील पाठवू शकता.तुम्ही अद्याप २,००० रुपये बदलले नसल्यास, आता तुम्ही RBI च्या १९ कार्यालयांपैकी कोणत्याही एका कार्यालयात जाऊ शकता किंवा पोस्ट ऑफिसद्वारे पाठवू शकता. २,००० रुपयांच्या नोटा बदलण्यासाठी किंवा जमा करण्यासाठी ठ्ठख कोणतेही शुल्क आकारणार नाही.देशात RBI ची १९ प्रादेशिक कार्यालये आहेत. या कार्यालयामध्ये दोन हजार रुपयांच्या नोटा तुम्ही जमा करु ||शकतात. RBI ची १९ प्रादेशिक कार्यालये ही अहमदाबाद, बंगळुरु, बेलापूर, भोपाळ, भुवनेश्वर, चंदीगड, चेन्नई, गुवाहाटी, हैदराबाद, जयपूर, जम्मू, कानपूर, कोलकाता, लखनौ, मुंबई, नागपूर, नवी दिल्ली, पटना आणि तिरुवनंतपुरम यांचा समावेश आहे. आरबीआयनुसार, कोणतीही संस्था किंवा व्यक्ती २०,००० रुपयांपर्यंतच्या २,००० रुपयांच्या नोटा बदलता येऊ शकतात. इतर मूल्यांच्या नोटा पुरेशा प्रमाणात चलनात आल्यावर, ठ्ठख नं २०१८-१९ या वर्षांपासून २ हजार रुपयांच्या नोटांची छपाई थांबवली. त्यानंतर, १९ मे २०२३ रोजी, क्लीन नोट पॉलिसी अंतर्गत ही मोठी नोट चलनातून बाहेर काढण्याची घोषणा करण्यात आली.

### भारतीय हवाई दलाला मिळाला

७२ वर्षांनंतर वायू दलाच्या झेंड्यामध्ये बदल करण्यात आला आहे. हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापनदिनानिमित्त आज, रविवारी भारतीय हवाई दलाला नवा ध्वज मिळाला आहे.

हवाई दलाचे प्रमुख एअर मार्शल व्हीआर चौधरी यांनी परेड दरम्यान नवीन ध्वजाचं अनावरण केलं. नवीन ध्वजावर उजव्या कोपर्यात भारतीय वायुसेनेचे चिन्ह असून त्यामध्ये त्यात हिमालयन गरुड आणि अशोक स्तंभाची भर पडली आहे. अशा नव्या रुपात आता भारतीय वायू दलाचा नवा ध्वज दिमाखात फडकवण्यात आला.

८ ऑक्टोबर हा दिवस 'भारतीय वायु सेना दिन' म्हणून साजरा केला जातो. भारतीय वायू सेना दल हे जगातील सर्वात शक्तीशाली हवाई दलांपैकी एक आहे. भारतीय वायु सेनेच्या ताकदीमुळे आज कोणताही देश भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याचं धाडस करत नाही. गेल्या काही वर्षांमध्ये भारताच्या लष्करी सामर्थ्यात आणखी वाढ झाली आहे. भारतीय हवाई दलाची स्थापना ८ ऑक्टोबर १९३२ रोजी ब्रिटिशांनी रॉयल भारतीय हवाईदल म्हणून केली होती. सुब्रोतो मुखर्जी हे पहिले भारतीय एका स्काड्रनचे वायुदलाचे प्रमुख होते.

### सिक्कीममध्ये ९ लष्करी जवानांसह

२३, मंगन जिल्ह्यातील १५ आणि नामची येथील सहा लोक बेपत्ता आहेत. शोधमोहिमेसाठी विशेष प्रकारचे रडार, ड्रोन आणि लष्कराचे श्वान तैनात करण्यात आले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सिक्कीमची जीवनवाहिनी असलेला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक दहाच्या पृष्ठभागाचे आणि तिस्ता नदीवरील अनेक पुलांचे नुकसान झाल्यामुळे हा महामार्ग वापरयोग्य राहिलेला नाही. रांगपो आणि सिंगताम दरम्यानचा रस्ता सुरू करण्याचे व त्याचे रुंदीकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.राज्याची राजधानी गंगटोकला जाणारे पर्यायी मार्ग पूर्व सिक्कीम जिल्ह्याच्या मार्गाने खुले आहेत. मात्र, उत्तर सिक्कीममध्ये मंगनच्या पलीकडील रस्त्यांचा संपर्क तुटलेला आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.


## राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ व १३ तसेच कृष्णा खोरे अंतर्गत जमिनी गेलेल्या खातेदारांनी नुकसान भरपाई मागणी प्रस्ताव सादर करावेत

सोलापूर/प्रतिनिधी: भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र. १३ सोलापूर विजापूर बाहयवळण / चार पदरी रस्ता हा उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुक्यातीतून गेलेला आहे. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.९ (नवीन क्र.६५) हा माढा, मोहोळ, उत्तर सोलापूर दक्षिण सोलापूर या तालुक्यामधून गेला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. १३ सोलापूर विजापूर बाहयवळण व चारपदरी रस्त्यासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील कवठे , डोणगांव ,नंदूर ,बसवेश्वरनगर ,

समशापूर , हिरज ,बेलाटी व दक्षिण सोलापूर तालुक्यातील मौजे टाकळी , नांदणी , बसवनगर , मंद्रुप ,वडकबाळ , हत्तूर असे एकूण १३ गावचे काही बाधित खातेदारांनी अद्याप नुकसान भरपाई मागणी प्रस्ताव सादर केलेले नाहीत.राष्ट्रीय महामार्ग क्र. ०९ (नवीन क्र.६५) पुणे- सोलापूर महामार्गासाठी माढा तालुक्यातील वेणेगांव , वरवडे , अरण , चव्हाणवाडी , टेंभूर्णी , रांझणी , मोडनिंब तसेच मोहोळ तालुक्यातील शेटफळ , मोहोळ , सावळेश्वर ,चिंचोळी , यावली , चिखली व उत्तर सोलापूर तालुक्यातीलल बाळे , केगांव , सोलापूर असे एकूण १६ गावांमधील काही बाधित खातेदारांनी अद्याप नुकसान भरपाई मागणी प्रस्ताव सादर केलेले नाहीत. तरी वर नमूद गावचे बाधित खातेदारांना यापूर्वीच उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ११ कृष्णा खोरे सोलापूर या कार्यालयाकडून राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ (१९५६ चा ४८) आणि १९९७ चे सुधारणा कायदा कलम ३ऋ(१) (२) आणि ३क(२) (३) आणि ३ए (१) (२) नोटीशीन्वये वारंवार सर्व बाधित खातेदारांना सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन नुकसान भरपाई मिळणेकामी मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत यापूर्वी कळवून सुध्दा अद्याप काही बाधित खातेदारांनी नुकसान भरपाई मिळणेकामी मागणी प्रस्ताव सादर केले नाहीत.तरी वर नमूद महामार्गासाठी संपादित होणाऱ्या जमिनीची नुकसान भरपाईची रक्कम घेऊन जाणेकामी सर्व वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्दी देण्यात यावी.सदरची मोबदल्याची नुकसान भरपाईची रक्कम घेऊन न गेल्यास राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदीनुसार तुम्हांस देय असलेली नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा न्यायालयात जमा करणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक ११ तथा सक्षम प्राधिकारी अभिजीत पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकांना वेळ कळविले आहे.

## जिल्हा उद्योग केंद्राच्या परिसरात 'मधुबन' या ब्रँड ने मध विक्री सुरू

सोलापूर/प्रतिनिधी: मध संचालनालय महाबळेश्वर येथे मध उत्पादन प्रक्रिया केंद्र असुन येथील महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मध मधुबन या ब्रँन्ड नावाने विक्री करण्यात येत आहे. या मधाचे विक्री केंद्र सोलापूर येथे जिल्हा उद्योग केंद्र यांचे परिसरात दिनांक ४ ऑक्टोबर २०२३ रोजी पासुन महात्मा गांधी जयंती निमित्त सुरू करण्यात आले आहे.



ह्या विक्री केंद्रा मध्ये नॅचरल मध व सेंद्रीय मध असे दोन प्रकारचे मध सद्या विक्री करीता उपलब्ध आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी मध खरेदी करण्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी सोलापूर यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मध संचालनालय महाबळेश्वर येथे जिल्हा अंतर्गत शेतकरी, प्रगतशिल मधपाळ (केंद्र चालक) यांना मधमाशा पालन प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण घेवुन मधमाशा पालन उद्योग सुरु केलेल्या लाभार्थी कडुन हमी भावाने मध खरेदी केला जातो. तसेच महाबळेश्वर येथे सेंद्रीय मध उत्पादन करण्यात येते.

**मधाचे उपयोग**-आयुर्वेदीक औषधे मधाबरोबर घेतल्याने औषधाची परिणामकारकता वाढते. भाजलेल्या व अन्य जखमा भरून येण्यासाठी अँटिबायोटीक/अँटिसेप्टिक. खोकला, कफ, दमा या विकारांवर. यकृताच्या, पोटाच्या आजारावर मध सेवनाने फायदा होतो. लहान मुलांना व वृध्दांना ताबडतोब हुशारी वाढवण्यासाठी. थकवा दूर करण्यासाठी, जलद कार्यशक्ती वाढवण्यासाठी. आयुर्मान वृध्दीसाठी, शरीराची झीज भरून काढण्यासाठी. वजन कमी करण्यासाठी. डोळ्यांच्या विविध विकारांवर अंजन म्हणून. विविध कायाकल्पात फेशियलकरीता, सौंदर्यप्रसाधनात. हृदयाच्या स्नायुंना ताकद मिळते. आम्लपित्त कमी करण्यासाठी. हाडांच्या बळकटीसाठी. व्रण भरून काढण्यासाठी. १० ग्रॅम मधापासुन सुमारे ३० ते ३५ कि. कॅलरीज मिळतात. केसांच्या सौंदर्यासाठी व वृध्दीसाठी. विधि व धार्मिक कार्यात ( उदा. पंचामृत ),निसर्गोपचार पध्दतीमध्ये.

तरी ज्यांना मध घ्यावयाचा आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, व्दारा जिल्हा उद्योग केंद्र, किनारा हॉटेल समोर, होटगी रोड, सोलापूर येथे संपर्क साधवा. तसेच नैसर्गिक पद्धतीने तयार झालेला मध खरेदी करण्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी सोलापूर यांनी केले आहे.

**हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble



# घोळसगांव शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी रामेश्वर पाटील यांची निवड

अक्ककोट/प्रतिनिधीः जि.प. प्राथ. मराठी शाळा घोळसगांव ता अक्कलकोट येथील शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी रामेश्वर पाटील यांची निवड करण्यात आले तर अब्दुल राजेशा फ़क़ीर यांची उपाध्यक्ष पदी सर्वानुमते निवड करण्यात आली.शा. व्य. समिति नविन सदस्य पुढील प्रमाणे परवीन आरिफ दिवटे, जागृति नरसिंग कोलाटी, पल्लवी महेश त्रिगुळे, रुकसाना घुदुशा फ़क़ीर, प्रियंका मल्लिनाथ हडपद, रेश्मा काशीलिंग कोळी, गोविंदा श्रीमंत सगटे, अ. अ. गुंजोटे, सो. द. मोरे. (सचिव) ,इरन्ना म. आलूरे ( शिक्षण तज्ञ) सर्व सदस्यचे शाळेचे शिक्षण तज्ञ श्री . इरण्णा म . आलूरे सर यांनी मार्गदर्शन केले. आणि शाळेचे मुख्याध्यापक श्री सो . द. मोरे. यांनी. सर्व नव नियुक्त सदस्याचे पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. शाळेतील शिक्षक श्री. दरेकर. श्री ठाकर. व श्री. गुंजोटे सर यावेळी उपस्थित होते.

# राहुल रेखावर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांना जागतिक विक्रमवीर गिर्यारोहक यांची कडून भेट

पत्रकार नामदेव निर्मळे

कोल्हापूरची गिर्यारोहक कुमारी अन्वी घाटगे हिने राहुल रेखावार , जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या कार्यालयात जागतिक विक्रम गिर्यारोहक अन्वी अनिता चेतन घाटगे यांनी त्यांची भेट घेऊन घेतले



भारतीय उपमहाद्वीपा मधील उंच शिखर तसेच कर्नाटक राज्यातील सर्वोच्च शिखर मूल्यणगीरी सर करून जागतिक विक्रम केल्याबद्दल वर्ल्ड रेकॉर्डचे ट्रॉफी व सर्टिफिकेट साहेबांच्या कडून प्रदान केले... तसेच पुढील मोहिमेबाबत चर्चा करून जिल्हाधिकारी यांनी अन्विस पुढील मोहिमेसाठी शुभेच्छा दिल्या. सदरचा कार्यक्रम हा रात्री १०.३० वाजता पार पडला. त्यानंतरही जिल्हाधिकारी आपल्या कार्यालयात कामकाज करतच होते.अजून त्यांचे कडे शाही दसरा महोत्सव, पर्यावरण,व इतर् असे २०-२५ अभ्यंगत मीटिंग करता थांबून होते. रात्रीचे एक-दोन वाजेपर्यंत जनतेची कामे करणारा. सर्व अभ्यंगतांची अस्तेने विचारपूस करून.त्यांची कामे तात्काळ मार्गी लावणारे महाराष्ट्रातील एकमेव जिल्हाधिकारी आहेत

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पुणे शहर उपाध्यक्षपदी चनप्पा कलशेट्टी

पुणे : गोगांव ता अक्कलकोट या सारख्या ग्रामीण भागातून जाऊन सामाजिक कार्य करत बहुजन समाजातील लोकांना न्याय देण्यासाठी सतत लढा देणाऱ्या चनप्पा कलशेट्टी यांचे



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पुणे शहर उपाध्यक्षपदी शहराध्यक्ष श्री.दिपकभाऊ मानकर, यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी कार्याध्यक्ष श्री.प्रदिपदादा देशमुख, सौ.प्रियाताई गदादे, युवकाध्यक्ष श्री.समीरदादा चांदेरे यांच्या हस्ते सर्व सेल अध्यक्ष, कार्याध्यक्ष, विधासभा प्रभाग अध्यक्ष, सरचिटणीस, चिटणीस, संघटक सचिव नेमुन त्यांना पदनियुक्ती देण्यात आली.

समाजहितासाठी काम करा, आपला पक्ष हा प्रत्येक घटकापर्यंत पोचवा व त्याला न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करा. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा तसेच अजितदादा पवार यांच्या विचाराच्या व लोकहिताची कामे करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय दिला जाईल अशी ग्वाही शहराध्यक्ष दिपकभाऊ मानकर व प्रदीप देशमुख यांनी दिली.यावेळी विधानसभा अध्यक्ष श्री संतोषभाऊ नांगरे, प्रदेश प्रतिनिधी श्री.शिवाजीभाऊ गदादे, विधानसभा कार्याध्यक्ष श्री.विपुल म्हैसुरकर, कार्याध्यक्ष श्री.रामदास गाडे, सेवादलाच्या अध्यक्षा सौ.शशिकलाताई कुंभार, सामाजिक सेल अध्यक्ष श्री.जयदेव इसवे, ओ.बी.सी सेल कार्याध्यक्ष श्री.रूपेश आखाडेप्रभाग २८ अध्यक्ष राहुल गुंड करण गायकवाड आदि मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र तुळजाई देवस्थान नवरात्र महोत्सवाच्या अध्यक्षपदी शिवंमा ख्याडे

बरुर/प्रतिनिधीः दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरुर येथील श्रीक्षेत्र तुळजाई देवस्थान शारदीय नवरात्र महोत्सव २०२३ च्या अध्यक्षपदी शिवंमा पंचप्पा ख्याडे यांची एकमताने निवड करण्यात आले. तर उपाध्यक्ष गंगाबाई शिवाजी पवार, खजिनदार लक्ष्मण सदरखेड सर, सचिव सुज्ञानी स्वामी, सहसचिव सुमित्रा आपाशा रगटे यांची निवड करण्यात आले....



श्रीक्षेत्र तुळजाई देवस्थानच्यावतीने नवरात्र महोत्सव साजरा करण्याचे यंदाचे हे १७ वे वर्षे आहे. आधी श्री योगायोग मंडळाच्या नावाने साजरा केला जात होता..मात्र तुळजाई मंदिर १७ मे २०२२ रोजी पूर्ण झाले तेव्हापासून श्रीक्षेत्र तुळजाई देवस्थान नवरात्र महोत्सव या नावाने साजरा करण्यात येतोय. तुळजापूरहून पायी चालत ज्योत आणून ज्योत समवेत तुळजाई देवीची गावात भव्य मिरवणूक काढून सभामंडपात देवीची स्थापना करून नवरात्र महोत्सव ची सुरुवात होते. यामध्ये रोज सकाळ व संध्याकाळ ७ वाजता महापूजा करण्यात येईल.. महापूजानंतर फराळ वाटप होईल. चौथ्या माळेला रात्री जागरण गोंधळ, अस्टमी दिवशी होम हवन, विजयादशमी दिवशी रात्री पुन्हा देवीला मूळ जागी मंदिरात स्थापना करून महोत्सव सांगता करण्यात येईल.

यावेळी देवस्थानचे सर्व पदाधिकारी चंद्रकांत चौगुले, अशोक चौगुले, गोविंद बामणे ,गुरू ख्याडे, रमेश शिरढोणकर, सिद्धाराम सुतार , संजय चौगुले , बसवराज ब कुंभार, शिवबाळ कुंभार, बसवराज कुंभार, देवराया सदरखेड, महमद टेकडे, सिद्धाराम वाघमोडे, मलकप्पा कुंभार , कुबेर कनशेट्टी, अजित शिरढोणकर, शरणप्पा इंडी आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच महिलावर्ग परजेवी रगटे, गंगाबाई लाड, कमळाबाई लाड, सुमन टेळे, शेकव्वा टेळे, ललिता वाघमोडे, द्रोपती चौगुले, लक्ष्मीबाई नंद्राळे, महादेवी सदरखेड, राजेश्री मठपती, जकव्वा ख्याडे, ललिता शिरढोणकर ,सरदू मकानदार , गुरुबाई यळमेली आदी महिला, ग्रामस्थ उपस्थित होते..

# १९ व्या युवा महोत्सवासाठी 'स्वेरी कलापंढरी सज्ज!

पंढरपूर/प्रतिनिधीः पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा १९ वा युवा महोत्सव पंढरपूर येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे मंगळवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी द वाजता होणार असून मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा पार पडणार असल्याची माहिती स्वेरीचे संस्थापाक व सचिव तथा स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरचे प्राचार्य डॉ. बी. पी. रांगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवारी सकाळी दहा वाजता सोलापूर लोकसभेचे खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभागप्रमुख व युवा लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक बिभीषण चवरे यांच्या शुभहस्ते उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. अध्यक्षस्थानी पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे असतील. दि. १० ते १७ ऑक्टोबर या कालावधीत नृत्य, नाट्य, ललित, वाङ्मय, व एकूण ३९ स्पर्धा या युवा महोत्सवात होणार आहेत. सुमारे ६० महाविद्यालये आणि जवळपास १६०० पेक्षा जास्त विद्यार्थी कलाकारांचा यामध्ये सहभाग राहील असा अंदाज आहे.

युवा चेतना रॅलीने काही प्रातिनिधिक महाविद्यालयात जाऊन विद्यार्थी कलावंतांना व रसिकांना या युवा महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थी कलावंतांनी या युवाः चेतना रॅलीला भरघोस प्रतिसाद दिला आहे.

युवा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी मंगळवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता रजिस्ट्रेशन, उद्घाटन समारंभ, संघ व्यवस्थापकांची बैठक झाल्यानंतर स्पर्धांना सुरुवात होईल, मूकनाट्य, समूहगीत, कातरकाम, अजन, प्रश्नमंजुषा (लेखी), मराठी-हिंदी-इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा, भारुड, काव्यवाचन, भित्तीचित्रण, मेहंदी, लावणी आणि एकांकिकेचे

सादरीकरण महोत्सवाच्या पहिल्या दिवशी होणार आहे. दुसऱ्या दिवशी बुधवार दि. ११ रोजी शास्त्रीय नृत्य, सुगम गायन, पोवाडा, पथनाट्य, स्थळचित्रण, वादविवाद, लोक वाद्यवृंद, जलसा, शास्त्रीय सुखाद्य, कथाकथन, मिमिक्री, व्यंगचित्र, कव्वाली आणि एकांकिका आदी स्पर्धा पार पडतील. गुरुवार दि. १२ ऑक्टोबर रोजी प्रश्नमंजुषा (तोंडी), निर्मिती चित्र, शास्त्रीय गायन, पाश्चात्य समूहगायन, प्रहसन, पाश्चिमात्य वादन, रांगोळी, शास्त्रीय तालवाद्य, मातीकाम आणि लोकनृत्याच्या स्पर्धा

शुक्रवार, दि. १३ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ८ वाजता शोभायात्रा पार पडल्यानंतर दुपारी एक वाजता पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार समाधान आवताडे युवा अभिनेत्री सोनाली पाटील यांच्या शुभहस्ते विजल्या बक्षीस वितरण केले जाणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर है असतील तर कुलसचिव योगिनी घारे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य देवानंद चिलवंत आणि वित्त व लेखाधिकारी सीए श्रेणिक शहा यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राहणार आहे..चंदाच्या उन्मेष सृजनरंगाचा या युवा महोत्सवाची तयारी आता अंतिम टप्पात आली आहे. पाऊस आला तरी विना व्यत्यय स्पर्धा सुरु राहाव्या अशा पद्धतीने रंगमंच व्यवस्थापन केलेले आहे. सर्व रंगमच्यासाठी उत्तम दर्जाची साउंड तसेच लाईट व्यवस्था याचे नियोजन करण्यात आलं आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ३०. समित्यांचे गठन करण्यात आले असून, त्यांच्याद्वारे संस्थापक व सचिव प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी, संघाव्यस्थापक, परीक्षक मान्यवर यांच्या भोजन, निवास आदी व्यवस्थेचे उत्तम नियोजन करण्यात आले आहे. विकास विभाग संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, युवा महोत्सव आयोजन सदस्य डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. डी. जी. शिंदे यांच्या पथकाने सर्व तयारीची पाहणी करून त्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

'ट्रेड एक्स्पो २०२३' चे खास आकर्षण

युवा महोत्सवाचे औचित्य साधून स्वेरी नेहमी काही नवीन उपक्रम राबवित असते. याच परंपरेचा भाग म्हणून एम. बी. ए. विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. करण पाटील यांच्या नेतृत्वाखाली ट्रेड एक्स्पो २०२३ या उद्योग महोत्सवाचे आयोजन केले आहे. त्यामुळे रसिकांना एकाच महोत्सवात सांस्कृतिक आणि व्यवसाय क्षेत्रातील अश्या दोन महोत्सवाचा आनंद घेता येणार आहे.

जिल्हयातील कलावंतांची जपली स्मृती

मुख्य रंगमंचाला कला वारकरी मुख्य रंगमंच, तर लोककलेच्या रंगमंचाला प्रसिद्ध लोककलावंत लावणीसम्राट के. ज्ञानोबा (माऊली) यांचे नाव देण्यात आलेले आहे. वाङ्मय कलाप्रकार जेष्ठ मराठी साहित्यिक कै. द. मा. मिरासदार शब्दांगण मंचावर तर संगीत कला प्रकार जेष्ठ गायक कै. प्रल्हादा यांचे नाव देण्यात आले आहे. ललितकला प्रकाराच्या स्पर्धा के. कवी संजीव स्मृती कलादालनात पार पडणार आहेत.

या पत्रकार परिषदेस संस्थेचे अध्यक्ष श्री. दादासाहेब शेंगे, जेष्ठ विश्वस्त श्री एन. एस. कागदे, जेष्ठ विश्वस्त श्री. एच. एम. बागल, जेष्ठ विश्वस्त श्री. धनंजय सालविठ्ठल, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, कॅम्पस प्रमुख डॉ. एम. एम. पवार, डिप्लोमा कॉलेजचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. मणियार, डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य प्रा. मांडवे, शैक्षणिक विभाग अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, सांस्कृतिक विभाग व संवादप्रमुख डॉ. यशपाल खेडकर, समन्वयक प्रा. करण पाटील, डॉ. महेश मठपती, डॉ. डी. एस. चौधरी विविध विभागांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख उपस्थित होते.

# शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांची धाराशिव जिल्ह्याच्या संपर्कप्रमुख पदी नियुक्ती

सोलापूर/महेश गायकवाड : शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांचे पद मिळाल्यापासून चार महिन्याच्या कालावधीतील कामाचा धडाका पाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांच्यावर धाराशिव जिल्ह्याच्या संपर्कप्रमुख पदी निवड करून पदभार सोपवला व तसे नियुक्तीपत्र प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांना दिले.



शिवसेनेचा राज्य प्रवक्तेपदी डॉ. वाघमारे यांची निवड होताच सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन याचा वर्षाव झाला पद मिळताच डॉ.वाघमारे यांनी कामाला सुरुवात केली. शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत सर यांचा नेतृत्वाखाली मोदी विभागात महाआरोग्य शिबिर घेऊन ११००० रुग्णांना त्याचा लाभ मिळवून दिला. या शिबिराला मिळालेला प्रतिसाद पाहून शहरात त्यानंतर दहा वेगवेगळ्या ठिकाणी अशी महाआरोग्य शिबिरे घेतली गेली. यामधून जवळपास दीड लाख रुग्णांना या शिबिराचा लाभ मिळाला.

तसेच शहरातील सात रस्ता ते जुना एम्प्लॉयमेंट चौक यादरम्यान असलेल्या व्हीआयपी रोडवर एका परप्रांतीय व्यवसायिकाने मोची नावाने दुकान थाटले होते त्या दुकानात असलेल्या चप्पल आणि बुटांवर मोची हे नाव प्रिंट करण्यात आले होते यावेळी हा मोची समाजाचा अवमान व अपमान आहे म्हणून यावर आवाज उठवला व संबंधित दुकान मालकावर ट्रॉसिटी चा गुन्हा दाखल करावा असा आशयाचे निवेदन पोलीस आयुक्तांना दिले व संबंधित दुकानासमोर तीव्र आंदोलन केले. यावेळी दुकान मालकाने मोची अक्षर असलेल्या व विक्रीस ठेवलेल्या दुकानातील सर्व चप्पल व बूट काढून टाकले.

राज्य प्रवक्ते पद मिळाल्यानंतर कमी कालावधीतच प्रा. डॉ . ज्योती वाघमारे यांच्या कष्ट आणि जिद्दीचा धडाका पाहून राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि डॉक्टर वाघमारे यांच्यावर धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख पदाची धुरा सोपवली.

निवडीचे पत्र देताना मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी विधानपरिषदेचे उपसभापती नीलम ताई गोरे प्रवक्त्या शितल म्हात्रे, मनीषा कायांदे, प्रवक्ते नरेश मस्के, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे,युवा सेना शहरप्रमुख अर्जुन शिवसिंहवाले,भीमा वाघमारे आदी उपस्थित होते

# वागदरीत जावळे व सांगळे यांच्या बदली मुळे सत्कार करून दिला त्यांना निरोप : विद्यार्थ्यांच्या आश्रूचा फुटला बांध

वागदरी/एस.के.गायकवाड :जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी ता.तुळजापूर येथील सहशिक्षक किसन जावळे व सहशिक्षिका सुषमा सांगळे यांची अन्यत्र ठिकाणी बदली झाल्यामुळे वागदरी ग्रामस्थ व शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. याप्रसंगी सर शाळेतून बदलून जात असल्याचे विद्यार्थ्यांच्या कानावर पडताच सर्व विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील अश्रू अनावर झाले. विद्यार्थ्यांच्या अश्रूंचा बांधच फुटला एखाद्या नवविवाहित मुलीला माहेरघरातून सासरी पाठविताना जे वातावरण निर्माण होते अगदी तसेच वातावरण कार्यक्रमाच्या ठिकाणी शाळेच्या प्रांगणात निर्माण झाले होते.

जि.प.प्राथमिक शाळा वागदरी ता.तुळजापूर येथे गेल्या चारपाच वर्षांपासून सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले किसन जावळे व सहशिक्षिका सुषमा सांगळे यांची अन्यत्र बदली झाल्याने येथील समस्त ग्रामस्थांच्या व शाळेच्या वतीने शाळेच्या प्रांगणात निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका महादेवी जत्ते ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण चे प्रभारी अध्यक्ष उमाकांत मिटकर,ग्रा प.सदस्य ज्ञानेश्वर पाटील, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी ,उपसरपंच मिनाक्षीताई बिरादार आदी होते.

प्रारंभी स्त्री शिक्षणाच्या प्रनेत्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करून सत्कार मुर्ती किसन जावळे व सुषमा सांगळे यांचा यथोचित सत्कार करून त्यांना उपस्थितीत ग्रामस्थ व शाळेच्या वतीने निरोप



देण्यात आला.

सत्काराला उत्तर देण्यासाठी जावळे सर उभारले असता विद्यार्थ्यांचा बराचवेळ ह्दयात साठवून ठेवलेला हुंदका बाहेर पडला आणि विद्यार्थ्यांच्या अश्रूंचा बांध फुटला विद्यार्थी हुंदके देऊन रडायला लागले.काही क्षण माहेरघरातून पहिल्यांदाच मुलीला सासरी पाठवताना जे वातावरण निर्माण होते तसे वातावरण शाळेत निर्माण झाले होते.

याप्रसंगी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष राजकुमार पवार ,उपाध्यक्ष मदन पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामसिंग परिहार,रिपाइं (आठवले)चे जिल्हा समन्वयक तथा पत्रकार एस.के.गायकवाड, दत्ता आण्णा सुरवसे,प्रमोद बिराजदार, जितेंद्र पाटील, बजरंग मिटकर,सूर्यकांत वाघमारे,भाजपा मेडिया सेलचे तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ,मोहन सोमंवशी,अमोल गोगावे,सुदर्शन सुरवसे गणपत सुरवसे,बाळु पवार,पकंज सुरवसे,ग्रा. प.सदस्य आमोल पवार,आपा मिटकर,अमोल परिहार,आजय बिराजदार सहशिक्षिका मनिषा चौधरी, आरती साखरे,सिआरपी विद्या बिराजदार,महानंदा मिटकर,सुरेखा यादव अंगणवाडीच्या पद्मीनी पवार,

रुपाली जाधव,अशा कार्यकर्ती पार्वती बिराजदार,दत्ता पाटील,सह विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन सहशिक्षक तानाजी लोहार यांनी केले तर आभार प्रदर्शन महादेवी जत्ते यांनी केले.

# पुणे-लातूर-पुणे इंटरसिटी रेल्वे बार्शी उस्मानाबाद मार्गे धावणार

अक्कलकोट/महेश गायकवाडः पुणे - लातूर- पुणे ही इंटरसिटी रेल्वे सुरु करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसापासून सुरु होती, अखेर प्रत्यक्षात येत्या १० ऑक्टोबरपासून ही इंटरसिटी रेल्वे सुरु होणार असून, त्याचे ऑनलाइन बुकिंग ८ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहे.

मराठवाड्यातून पुण्याकडे मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करत असतात. पुणे ही राज्याची सांस्कृतिक राजधानी आहे शिवाय अलीकडे पुण्याची ओळख आयटी हब म्हणून होऊ लागली आहे तसेच पुणे एक महत्त्वाच पर्यटन स्थळ देखील आहे. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील लातूरहून मोठ्या प्रमाणात प्रवासी दररोज पुण्याला येतात. कामानिमित्त, शिक्षणासाठी लातूर ते पुणे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या विशेष उल्लेखनीय आहे.यामुळे पुणे ते लातूर या रेल्वे मार्गावर सुरु असलेल्या ट्रेनमध्ये प्रवाशांची कायमच गर्दी पाहायला मिळते. सध्या लातूरहून पुण्याला जाण्यासाठी बिदर एक्सप्रेस, नांदेड एक्सप्रेस, हैदराबाद एक्सप्रेस आणि अमरावती एक्सप्रेस उपलब्ध आहेत.यापैकी बिदर एक्सप्रेस आणि नांदेड एक्सप्रेस रात्री धावतात तर हैदराबाद एक्सप्रेस आठवड्यातून तीनदा धावते तसेच अमरावती एक्सप्रेस आठवड्यातून दोनदा धावते. विशेष म्हणजे या ट्रेनमध्ये कायमच गर्दी राहते. यामुळे प्रवाशांना दोन-तीन महिने आधीच तिकीट बुकिंग करून घ्यावे लागते.असे करूनही अनेकदा प्रवाशांना या ट्रेनचे तिकीट मिळत नाही. परिणामी पुणे-लातूर इंटरसिटी एक्सप्रेस सुरू करण्याची मागणी केल्या काही दिवसांपासून जोर धरत होती.

अखेर येत्या १० ऑक्टोबरपासून ही इंटरसिटी रेल्वे सुरु होणार असून, त्याचे ऑनलाइन बुकिंग ८ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहे. त्याचे टाइमटेबल असे आहे. सकाळी ६:१० वाजता - पुण्याकडून लातूरला रवाना होईल आणि दुपारी १२:१० मी. लातूरला पोहोचेल तसेच दुपारी ३:०० वाजता लातूरहून पुण्याला रवाना होईल आणि रात्री ९:०० वाजता पुण्यात पोहचेल या आहेत मागण्या

**१) धाराशिव आणि बार्शी रेल्वे स्टेशनवर कोच इंडिकेटर बसविणेबाबत :** धाराशिव आणि बार्शी रेल्वे स्थानकावर अद्यापही कोच इंडिकेटर बसविण्यात आलेले नाहीयेत. या दोन्ही स्थानकावर वरिष्ठ नागरिक,महिला,दिव्यांग, लहान मुले घेऊन प्रवास करणारे प्रवासी इत्यादी, प्रवास करत असतात या दोन्ही स्टेशनवर येणाऱ्या गाड्या ह्या फक्त दोन मिनिटे थांबत असून , कोच इंडिकेटर बसविण्यात आले नसल्याने आपला कोच नेमका कुठे येणार हेच माहिती नसते, त्यामुळे प्रवाशांना खूप धावपळ करत गाडी पकडावी लागते.गाडी सुटण्याची भीती सल्याने प्रवासी धावपळ करतात, याविषयी वारंवार तक्रार



करूनही मध्ये रेल्वे प्रशासनाने अद्याप या दोन्ही स्थानकावर कोच इंडिकेटर बसविलेले नाहीयेत.

**२) हैद्राबाद-हडपसर या गाडीची वेळ पूर्वीप्रमाणे तसेच हि गाडी दररोज करणेबाबत:** पूर्वीची हैद्राबाद पुणे हि गाडी सध्या हैदराबाद हडपसर अशी धावत आहे परंतु ही गाडी पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांना सकाळची एकमेव गाडी आहे परंतु या गाडीची वेळ हि खूपच लवकर पहाटे ५.१० वाजता असल्याने खेडोपाड्यात राहणारे अनेक प्रवासी हैराण होत आहेत, त्यामुळे या गाडीला म्हणावा तेवढा प्रतिसाद मिळत नाहीये. प्रवाशांनी अशी मागणी आहे कि या गाडीची वेळ पूर्वीप्रमाणे उस्मानाबाद या ठिकाणी सकाळी ठीक ८ वाजता करण्यात यावी. जेणेकरून या गाडीचा लाभ जास्तीत जास्त लोक घेऊ शकतील. आपण यापूर्वीही पुणे-लातूर इंटरसिटी गाडीची मागणी वारंवार करत असून, तत्पूर्वी हैद्राबाद-हडपसर हि गाडी दररोज सुरु झाल्यास अनेक प्रवाशांना दिलासा मिळेल.

**३) पनवेल-नांदेड गाडीला बार्शी रेल्वे स्थानकावर थांबा देणेबाबत :** बार्शी रेल्वे स्थानकावर गेली कित्येक दिवस या दोन्ही गाड्यांचे थांबे उडविण्यात आले आहेत. प्रवासी सेवा संस्थेच्या माध्यमातून अनेकवेळा रेल्वे प्रशासनाला पत्रव्यवहार करूनही काहीतरी तांत्रिक करणे देऊन हा विषय टाळाटाळ करण्याचे काम सोलापूर मंडळ,रेल्वे प्रशासन करीत आहे. यामुळे बार्शी येथील अनेक प्रवाशांना नाहक त्रास भोगावा लागत आहे. विशेष म्हणजे हि गाडी क्रॉसिंगला स्टेशननजीक थांबवली जाते परंतु अधिकृत थांबा दिला जात नाही. रेल्वेच्या या लहरी कारभारामुळे अनेक प्रवाशी हैराण होत आहेत.

**४) बार्शी रेल्वे स्थानकावरील फूट ओव्हर ब्रिज विषयक :** गेली अनेक वर्ष बार्शी रेल्वे स्थानकावरील फूट ओव्हर ब्रिजचे काम पूर्ण करण्यात आले नाहीये. याविषयी असंख्य प्रवाशांनी तक्रार करूनही मध्ये रेल्वे प्रशासन, सोलापूर मंडळ याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष्य करत असल्याचे असे दिसून आले आहे. यामुळे नागरिकांना नाईलाजाने रेल्वे रुळावरून क्रॉस करून एका प्लॅटफॉर्म वरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जावे लागते,त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.

**५) कोव्हीड काळात बंद झालेल्या पॅसेंजर आणि एक्स्प्रेस गाड्या पूर्ववत करणेबाबत :** रेल्वे प्रशासनाने महाराष्ट्र शासनाच्या विनंतीवरून कोव्हीड काळात कोरोनाचे संकट वाढू नये याकरिता जिल्हा अंतर्गत रेल्वे प्रवासी वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला होता.आता कोरोनाचे संकट कमी झाले असून परिस्थिती पूर्ववत झाल्याचे सरकारच्या आकडेवारी वरून दिसून येत आहे तसेच अनेक कोरोना काळातले अनेक निर्बंध हटविण्यात आले आहेत. परंतु कोव्हीड काळात बंद झालेल्या पॅसेंजर आणि एक्स्प्रेस गाड्या अद्यापही पूर्ववत करण्यात आलेल्या नाहीयेत, यद्यपि महाराष्ट्रात गेली कित्येक महिने एस टी कर्मचारी संपावर आहेत त्यामुळे बससेवा पूर्णपणे ठप्प आहे त्यामुळे अनेक प्रवाशांना नाईलाजाने अधिकचे पैसे मोजून खाजगी वाहनाने जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. परंतु रेल्वेने काही गाड्या प्रवाशांचा योग्य तो प्रतिसाद नसल्याचे कारण दाखवत काही गाड्या कायमस्वरूपी बंद पाडण्याचे षडयंत्र केल्याचे दिसून येते.

लातूर यशवंतपूर हि साप्ताहिक एक्स्प्रेस गाडी सध्या लातूर स्थानकापर्यंत चालविण्यात येत आहे. हि गाडी लातूर स्थानकावरून हि गाडी सुटून बिदरमार्गे यशवंतपूर (बंगळुरू) या स्थानकापर्यंत आठवड्यातून तीन दिवस चालविली जात आहे. या गाडीला प्रवाशांचा म्हणावा तास प्रतिसाद नसल्याचे दिसून येते त्यामुळे लातूर मिरज रेल्वे मार्गावरील पंढरपूर, कुर्डुवाडी, बार्शी आणि उस्मानाबाद येथील प्रवाशांना या गाडीने प्रवास करता यावा याकरिता हि गाडी पंढरपूर किंवा कुर्डुवाडी स्थानकापर्यंत वाढवावी याचे कारण पंढरपूर हे भारतातील महत्वाचे देवस्थान असून देशाच्या कानाकोपऱ्यातून अनेक वारकरी या ठिकाणाला दरवर्षी येतात. तसेच कुर्डुवाडी हे रेल्वे स्थानक अतिशय महत्वाचे जंक्शन असून या ठिकाणहून देशाच्या विविध भागात रेल्वे गाड्या जातात, त्यामुळे या गाडीला प्रवासी संख्या वाढण्याची शक्यता जास्त असल्याने, हि गाडी नियमित करा अशी मागणी रेल्वे प्रशासनकडे करता येईल.आपण या विषयी योग्य तो पत्रव्यवहार करून हि गाडी कुर्डुवाडी किंवा पंढरपूर स्थानकापर्यंत वाढविण्याची मागणी रेल्वे प्रशासनाकडे आहे

# वन्यजीवन संवर्धन हीच काळाची गरज : वनपरिक्षेत्र अधिकारी करे



बार्शी/प्रतिनिधीः प्राणी आणि वनस्पती यांच संवर्धन करणे हीच मानवाची मुलभुत गरज निर्माण झाली पाहिजे,असे प्रतिपादन बार्शीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती अलका करे यांनी व्यक्त केले.

बार्शीतील बी पी सुलाखे वाणिज्य महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहाच्या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून बार्शीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीम अलका करे होत्या,तर अध्यक्ष स्थानी बी पी सुलाखे वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.पाटील होते,श्रीम.अलका करे यांनी वन्यजीव सप्ताहाबाबत माहिती देताना पुढे सांगितले की राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह भारतात दरवर्षी २ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत साजरा केला जातो. भारतातील वनस्पती आणि प्राणी यांचे संरक्षण आणि जतन करणे हा या सप्ताहाचा उद्देश आहे. वन्यजीव सप्ताहाची संकल्पना १९५२ मध्ये धोक्यात आलेल्या आणि धोक्यात असलेल्या प्राण्यांच्या जीवांचे रक्षण करण्याच्या दीर्घकालीन उद्दिष्टाने करण्यात आली.सध्या अनेक वन्यजीव व वनस्पती शेवटच्या घटका मोजत आहेत,तर काही प्राणी व वनस्पती आपल्या भागातून नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत,

अशा नैसर्गिक संपत्तीचे युवा पिढीने जतन संगोपन व त्यामध्ये वाढ होण्यासाठी अधिक जागरूक राहिले पाहिजे,मानवाच्या चुकीच्या सवयीमुळे नैसर्गिक समतोल बिघडला असून मानव जात आज अनेक नैसर्गिक आपत्तीचा सामना करत आहे,आज वनांचे क्षेत्र वाढणे अत्यंत आवश्यक असून किमान प्रत्येक युवकाने एक वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करावे,...

श्रीम अलका करे पुढे म्हणाल्या की एखादा प्राणी जखमी अवस्थेत असेल तर तात्काळ वन विभागाला कळविल्यास त्यास रेस्क्यू करून योग्य ते उपचार त्यावर करता येतील...

आज कार्यक्रमाचे प्रस्थाविक बी पी सुलाखे वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.पाटील यांनी करत वन्यजीव व वनस्पतीचे संरक्षण व संवर्धन ही किती गरजेचे आहे याचे महत्त्व विशद केले,

या कार्यक्रमात महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला...कार्यक्रमात वनरक्षक श्रीम.आयेशा शेख,श्री बालाजी धुमाळ,एस एस पुरी यांनी तर महाविद्यालयातील प्रा.जामगे,ग्रंथपाल श्रीम.यादव,श्रीम.ज्योती डोळस,श्रीम.संगीता देशपांडे यांनी सहभाग घेतला तर आभार श्रीम ज्योती डोळस यांनी मानले...

# आमदारांच्या पी ए सोबत जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी ठेवली विकास कामांची बैठक

सोलापूर/प्रतिनिधीः विकासामध्ये जितकी आमदारांची भूमिका महत्त्वाची आहे महत्त्वाची भूमिका त्यांच्या स्वीय सहाय्यक अर्थात पीए यांची पाहायला मिळते. आमदार हे महिन्यातून



अनेक दिवस मुंबईकडे असतात परंतु त्यांचा प्रतिनिधी म्हणून त्यांचा पीए जिल्ह्यात कामकाज बघतो.

याच विकासाच्या दृष्टीने सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आमदारांच्या पीए सुद्धा तितकेच महत्त्व देत त्यांच्यासाठी वेळ देत बैठक ठेवली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाचे सर्वच आमदारांच्या पीए कडून स्वागत केले जात आहे.जिल्हा नियोजन समितीच्या कामांचा पाठपुरावा हा आमदारांचे पीए करतात. नियोजन समितीतून शेकडो कोटीचा निधी वितरित केला जातो. कामांची यादी तयार झाल्यानंतर नियोजन समिती मधून मंजुरी दिले जाते. सोलापूर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यात विधानसभेचे ११ आमदार आहेत त्यानंतर विधान परिषदेचे दोन आमदार असे तेरा आमदार जिल्ह्याचा कारभार पाहतात. प्रत्येक आमदाराकडे किमान दोन ते तीन पीए संख्या आहे. निश्चितच या बैठकीनंतर अनेक विषय मार्गी लागतील आणि विकासाला चालना मिळेल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# केंद्रातील भाजपा सरकारचे अपयश घराघरापर्यंत पोहचवा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ

अक्कलकोट/प्रतिनिधी : केंद्रात सरकार खोटी आश्वासने देऊन सर्व जनतेची दिशाभूल करत फसवणूक करणाऱ्या भाजप सरकारचे अपयश घराघरापर्यंत पोहचवा, असे आवाहन शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनी केले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आयोजित कार्यक्रम ' होऊ दे चर्चा ' या राज्यस्तरीय आभियाना अंतर्गत अक्कलकोट तालुक्यातील शहरी भागातील भाजपच्या मध्यवरती कार्यालय समोर मल्लिकार्जुन मंदिर प्रांगण येथे होऊ दे चर्चा रथाचे उद्घघाटन अनिल कोकीळ यांच्या हस्ते संपन्न झाला त्यावेळी आयोजीत कार्यक्रमात बोलत होते. अनिल कोकीळ म्हणाले जनतेला खोटी आश्वासने देऊन भाजप सत्तेत आल्या मात्र गेल्या नऊ वर्षात भाजपने जनतेची मोठी फसवणूक केली असल्याचे जनतेने जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकिळ व तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या समोर संतप्त भावना व्यक्त केले जनतेमध्ये भाजप बद्दल प्रंचड चिड निर्माण झाल्याचे दिसुन आले महागाई,बेरोजगारी, शेतकरीयांचे प्रश्न, स्मार्ट सिटीचे भोगस कामे, इंधन दरवाढ व इतर मूलभूत प्रश्नांवरील सरकारचे अपयश शिवसैनिकांनी घरोघरी सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचवा असे आवाहन



केले.

हे कार्यक्रम तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली खाली अक्कलकोट विधानसभा संपर्क प्रमुख उमेश सारंग, सोलापूर जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हाप्रमुख सुनील कटारे महिला जिल्हाप्रमुख प्रिया ताई बसवंती, जिल्हा उपप्रमुख शहर प्रमुख सिद्धाराम गुब्याड सोपान निकते,शहर संघटक सचिन जकापूरे, समन्वयक श्रीशैल पाटील, शहर उपप्रमुख श्रीकांत शेडम,गंगाराम धोत्रे, शरण सूरवसे, गुरनिगप्पा पाटील, उमेश साळुंखे, आयाज जमादार, अफसर मकानदार ,हणमंत नागुरे, परमेश्वर ठोबंरे ,मुरगेंद्र मुडनकेरी ,बसवराज पूजारी, मल्लिनाथ अरवतकल,श्रीशैल स्वामी राजकुमार गोणापुरे व इतर सर्व तालुक्यातील नागरिक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाटा पॉवर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट व बॉस्को ग्रामीण विकास केंद्राच्या कार्यशाळा

## ग्रामविकासाचा कणा हा गावातील नैसर्गिक संसाधन : अश्विनीकुमार पाटील



अक्कलकोट/प्रतिनिधीः ग्रामविकासाचा कणा हा गावातील नैसर्गिक संसाधन आहे. या संसाधनाचा उपयोग योग्य पद्धतीने व शास्त्रीय दृष्टीकोनातून केला तरच गावे समृद्ध होतील, असे प्रतिपादन टाटा पॉवर रिन्युएबलचे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनीकुमार पाटील यांनी केले.

टाटा पॉवर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट व बॉस्को ग्रामीण विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विभागीय निवासी कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी अश्विनीकुमार पाटील दृकश्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्स) माध्यमातून बीज भाषणात भावना व्यक्त केली. तर टाटा समूहाने आतापर्यन्त सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात केलेल्या कार्याची त्यांनी माहिती दिली.भारतीय उद्योग क्रांतीचे जनक जमशेदजी टाटा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी टाटा पॉवरचे महादेव साबळे, विश्वास सोनवले, सागर उशीर, बॉस्को ग्रामीण विकास केंद्राचे फादर जॉर्ज दाब्रिओ, दत्तात्रय गायकवाड, संदिप बेरड, भुजलतज्ञ श्रीकांत मौर्य आदींसह सरपंच, शेतकरी, महिला उपस्थित होते.या कार्यशाळेसाठी टाटा पॉवर कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट काम करीत असलेल्या महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या प्रातिनिधिक प्रतिनिधी उपस्थित होते. टाटा पॉवर पवन उर्जा विभागाचे मुख्य कार्यकारी परेश सहस्त्रबुद्धे ह्यांनी टाटा पॉवर ने जलसंवर्धन व महीला सक्षमीकरणाच्या झालेल्या कामामुळे होत असलेला सकारात्मक विकासाची त्यांनी माहिती दिली.महादेव साबळे यांनी टाटा समूहाने केलेल्या कामांची माहिती देऊन पवन उर्जा व सौर ऊर्जाचे होत असलेले फायदे सांगून समाजाने अशा अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पची निर्मिती करणे कामी समाजाने सहकार्य करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकात बॉस्को ग्रामीण विकास केंद्राचे संचालक फादर जॉर्ज ह्यांनी तीन दिवसात होणाऱ्या कार्यशाळेच्या माध्यमातून विविध विषय सविस्तर माहिती सांगितले. यामध्ये भूजल व्यवस्थापन व संवर्धन, सुशासन, पाण्याचा ताळेबंद, ग्रामस्तरीय नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन समितींची बांधणी, सेंद्रिय शेती व आंतरपीक व्यवस्थापन तसेच विविध कृषी विभागाशी संलग्न शासकिय योजनांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आले

तीन दिवसीय कार्यशाळा शिबिरात विविध विषयावर तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत. भूजल तज्ञ श्रीकांत मौर्या, यशदाचे प्रशिक्षक अशोक सब्बन, आत्माचे अधिकारी उमेश डोईफोडे, जिल्हा ग्राम विकास विभागाचे दत्ता उरमुडे, राहुरी कृषी विद्यापीठाचे डॉ. रणसिंग आदी मार्गदर्शन करणार आहेत. सोलापूर, सांगली, जालना, धाराशिव, बीड, सातारा, अहमदनगर इत्यादी ठिकाणाहून आलेल्या प्रतिनिधिना मार्गदर्शन केले

या कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थी राळेगणसिद्धी, हिवरे बाजार व नगरमधील टाटा पॉवरच्या आर्थिक सहकार्याने आणि बॉस्को ग्रामीण विकास केंद्राने अंमलबजावणी केलेल्या कामांची पाहणी करून त्याची सविस्तर माहिती दिले .

निरोप समारोप प्रसंगी गोगांव उपसरपंच कमलाकर सोनकांबळे व विलास चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले

या कार्यशाळेत किरणळी सरपंच सतीश कणमुसे, गोगांवचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, भुरिककवठेचे मलीनाथ शिदोरे, घोळसगाव सरपंच राजेंद्र किवडे, विनोद कदम, अस्लम मुल्ला , मकबूल कणमुसे , शाम सोनकांबळे, यशवंत गायकवाड, दत्ता व्हदलुरे यांच्यासह बचत गटाच्या महिला, सरपंच, सदस्य, पाणलोट विकास समितीचे पदाधिकारी, सुजाण ग्रामस्थ व युवकांचा सहभाग आहे.

